४७/१.वि.

निनावी व खोट्या सहीने शासनाकडे आलेल्या अर्जावरील कार्यवाही.

2016010711005737 07

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
परिपत्रक क्रमांक: शाकाप-1096/850/18,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 27 डिसेंबर, 1996.

## परिपत्रक

वाचा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: शाकाप-1085/58/18/(र. व का.), दिनांक 7 मे, 1985.

निनावी व खोट्या सहीने शासनाकडे आलेल्या अर्जावर कुठल्या प्रकारे कार्यवाही करावी, याबाबतच्या स्पष्ट सूचना शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: शाकाप-1085/58/18 (र. व का.), दिनांक 7 मे, 1985 अन्वये देण्यात आलेल्या आहेत. असे असूनही बहुतांशी दप्तर दाखल करण्यायोग्य तक्रारींची चौकशी होत असल्याने संबंधित अधिका-यांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. अशी तक्रार नुकत्याच मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिका-यांसाठी असलेल्या राज्यस्तरीय संयुक्त विचार विनिमय समितीच्या प्रतिनिधींबरोबर झालेल्या बैठकीच्या वेळी करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने शासन परिपत्रक, दिनांक 7 मे, 1985 ची प्रत सोबत जोडली आहे. सदर परिपत्रकातील सूचनांनुसार निनावी व खोट्या सहीने आलेल्या अर्जावर कार्यवाही करण्याची सर्व संबंधितांनी कृपया दक्षता घ्यावी.

प. द. जोशी,
शासनाचे उप सचिव.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

प्रति,

1. राज्यपालांचे सचिव,
2. मुख्य मंत्री यांचे सचिव,
3. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
4. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
5. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,

रोटा/एच-1054(3,500-12-96)-1.

6. शासनाचे मुख्य सचिव,
7. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
8. सचिव, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
9. सर्व मंत्रालयीन विभाग,
10. सर्व विभागीय आयुक्त,
11. सर्व जिल्हाधिकारी,
12. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
13. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
14. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
15. निवड नस्ती/18 (र. व का.)

एच-1054(3,500-12-96)-1अ.